**दिवाणी दावा क्र.७३/२०१२**
अनुसया थोरस वि. बाळकृष्ण नाडर
नि.क्र. १६० व १७८ वरुन

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ नामे अनुसया रिचर्ड थोरस यांचा शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादी क्र.३ यांचे विधीज्ञ श्री. एस.यु.माविनकुर्वे यांचेमार्फत</u>**

**६.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पहिल्या प्रसुतीच्या वेळेस माझे पती बाहेर होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पहिल्या प्रसुतीच्या वेळी माझी आई व प्रतिवादी अँजेलीना हिने सर्वकाही केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८८ साली अँजेलीना ही युएसए ला गेली होती. अँजेलीना दि.१८.०७.१९८८ रोजी युएसए ला जातेवळी तीने माझ्या आईला व अॅड. मोहनराव डोंगर यांना कुलमुखत्यारपत्र करुन दिल्याचे मला माहिती नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, अँजेलीना ही युएसए ला असताना माझी आई व तिच्या मुलाच्या नावे पैसे पाठवत होती. हे म्हणणे खरे आहे की, अँजेलीना युएसए ला गेली त्यावेळी माझी आई व अँजेलीनाचा मुलगा हे माझ्या सोबत राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, रेंजर्स् वरुन आम्ही गोखले नगर येथे राहण्यास गेलो त्यावेळी मी माझा मुलगा, माझे पती, माझी आई व अँजेलीनाचा मुलगा असे आम्ही सोबत राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, अँजेलीनाने युएसए वरुन पाठविलेले पैसे मी काढुन घरासाठी खर्च करत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईला बँकेच काम जमत नसल्याने बँकेसंदर्भातील आईची सर्व कामी मी स्वतः करत असायचे.

८. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी करण्यासाठी अँजेलीनाने आईच्या नावे पैसे पाठविले, आईच्या नावे कुलमुखत्यार पत्र असल्याने मिळकत अँजेलीनाच्या नावाने घेतली. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवरील बांधकामाकरीता अँजेलीनाने आईच्या नावे पैसे पाठविले होते ते पैसे मी काढुन घेतले होते व अँजेलीनाला बांधकाम संदर्भातील खर्चाचा तपशील देखील पाठविला होता. हे म्हणणे खरे नाही की, रेंजर्स् वरुन गोखलेनगर व गोखलेनगरवरुन सांगवी याठिकाणी करण्यात आलेल्या वाहतुकीचा खर्च देखील मी अँजेलीनाकडुन वसुल केला होता.

९.  हे म्हणणे खरे नाही की, मी अँजेलीनाकडुन घरभाडे, वीजबीलं देखील वसुन करुन घेतले होते. मला आता जानेवारी ते जुन १९९३ सालामधील झालेल्या खर्चाबाबत तपशील दाखविण्यात आला. सदरचा तपशील मी लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खर्चाचा तपशील मी अँजेलीनाला दिला होता व झालेला सर्व खर्च तिच्याकडुन वसुल करुन घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी अँजेलीनाच्या सांगनेवरुन रक्कम रु.७०,०००/- एस.एन.नाईक यांचेकडुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी अँजेलीनाकडुन दैनंदिन वापराच्या वस्तु युएसए वरुन मागवत होते. मला आता एक दैनंदिन वस्तुंची यादी दाखविण्यात आली. त्या वस्तु मी अँजेलीनाकडुन मागविलेल्या नाहीत. त्या वस्तु मी माझ्या आईसाठी मागविल्या होत्या. सदरच्या वस्तुंची यादी मी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अँजेलीनाकडुन ॲथॉरीटी लेटर मागविले होते.

**१०.**  मी दावा मिळकतीवर झालेल्या खर्चासंदर्भातील तपशील प्रकरणात दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अँजेलीनाने सन १९९५ पर्यंत वेळोवेळी माझ्या नावावर व आईच्या नावावर पैसे पाठविलेले आहेत. मला अँजेलीनाने सन १९९५-९६ साली पैसे पाठविले होते. मला आता दि.०४.१२.१९९५ रोजीचा ग्रेट वेस्टर्न बँकचा कॅशिअर्स चेक रक्कम रुपये १२०० डॉलर (कस्टमर कॉपीची मुळ प्रत) दाखविण्यात आला. सदरचा चेकचा क्र.०९६० असा असुन तो चेक मला अँजेलीनाने पाठविला होता. सदर चेकला **नि.क्र.२५६** देण्यात येते. मला आता दि.२५.०८.१९९६ रोजीचा ग्रेट वेस्टर्न बँकचा कॅशिअर्स चेक रक्कम रुपये १५०० डॉलर (कस्टमर कॉपीची मुळ प्रत) दाखविण्यात आला. सदरचा चेकचा क्र.१०७८ असा असुन तो चेक मला अँजेलीनाने पाठविला होता. सदर चेकला **नि.क्र.२५७** देण्यात येते. सदर धनादेश मधील पैसे मला मिळाले होते.

**११.**  अँजेलीनाने १९८८ ते १९९० सालापर्यंत आईच्या नावे कॅशिअर्स चेक पाठविल्याबाबत मला माहिती नाही.  हे म्हणणे खरे नाही की, अँजेलीनाने आईच्या नावे पाठविलेले सर्व चेकचे सर्व पैसे मी घेतले आहेत.  हे म्हणणे खरे नाही की, अँजेलीनाने पाठविलेले पैसे मी काढुन माझ्या नावे दावा मिळकत खरेदी केली. मला आता

दि.०१.०७.१९८९ रोजीचे पत्र दाखविण्यात आले. सदरचे पत्र मी लिहील्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या पत्रातील मजकुराप्रमाणे मी आईचा पुर्ण व्यवहार पाहत होते व मिळकत खरेदीकरीता किती रक्कम लागणार आहे हे मी नमुद केलेले आहे. मला आता त्या पत्राचे लिफाफे दाखविण्यात आले ते मला आठवत नाही. मला आता दि.१६.०५.१९९२ रोजीचे मी ॲंजेलीनाला दिलेले पत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यापत्रामध्ये मी तिला दावा मिळकतीतील स्लॅबसाठी रक्कम रु.७८,०००/- लागणार असल्याचे नमुद केले आहे.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, मी ॲंजेलीनाला दावा मिळकत घेण्यासाठी व त्यावरील बांधकामासाठी सतत पैसे मागितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सन १९८९ साली काहीही काम करत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८९ साली दावा मिळकत घेणेकामी माझेकडे मी कमवलेले पैसे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्याकाळात फोन नसल्यामुळे मी ॲंजेलीनाला पत्राद्वारे दावा मिळकतीच्या बांधकामाचा तपशील व लागणारे पैसे मागत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी ॲंजेलीनाला लिहिलेल्या पत्रामधुन फसवणुक झाली असे म्हणुन सदर दावा मिळकत माझी नाही असे लिहिले होते. मला आता आजरोजी प्रतिवादींनी दाखल केलेल्या दस्तऐवज यादीतील अनुक्रमांक १३ व १४ मधील पत्रं दाखविण्यात आली. सदरची पत्रं मी लिहिलेली नाहीत. त्यातील मजकुर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अनुक्रमांक १३ व १४ वरील पत्रं लिहिलेली आहेत. सन १९८८ ते सन २०१२ पर्यंत ॲंजेलीना भारतामध्ये तीन ते चार वेळा आली होती याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ॲंजेलीनाला पाठविलेल्या पत्रावर ती अवलंबुन होती.

**<u>उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

पिंपरी, पुणे
(श्रीमती. एस.एस.चव्हाण )

दिनांक :-०५.१२.२०२४
**२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**पिंपरी, जि. पुणे.**